# दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई

(दि विदर्भ को- ऑप. बँक लि. सम्मिलित)
(शेड्युल्ड बँक)
सर विठ्ठलदास ठाकरसी स्मृती भवन, ९, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन,
फोर्ट, मुंबई ४०० ००१, पोस्ट बॉक्स नं.४७२
फोन.नं. +९१-०२२-६९८०-११५१, ११७२, ११५७, ११७८
Website: https://msc.bank.in

## चल व अचल मालमत्ता विक्रीची निविदा सुचना

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप.बँक लिमिटेड., मुंबई **"सेक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲन्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) ॲक्ट, २००२"** नुसार खालील ०३ सहकारी सूत गिरण्या, ०१ सहकारी साखर कारखाना, ०१ मार्केटींग कंपनी व ०१ वैद्यकिय संस्था अशा एकूण ०६ कर्जदार संस्थांची मालमत्ता विक्रीसाठी मोहरबंद निविदा मागवित आहे. स्वामी समर्थ स. सा. का. लि. या संस्थेच्या मालमत्ता विक्रीसाठी मा. डी. आर. टी., पुणे येथील दावा क्र. एस.ए.४९०/२०२५ या दाव्यातील आदेशास अधीन राहून मोहरबंद निविदा मागवित आहोत.

निविदेतील अटी/शर्ती तसेच माहिती दि.०८.०४.२०२६ पासून दि.०७.०५.२०२६ पर्यंत बँकेच्या संकेतस्थळावर (https://msc.bank.in) उपलब्ध राहतील. निविदा प्रक्रियेचा तपशिल खालीलप्रमाणे.

**परिशिष्ट क्र.अ.**

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | निविदा फॉर्म विक्री | दि. ०८.०४.२०२६ ते दि. ०७.०५.२०२६ पर्यंत |
| २ | मालमत्ता पाहणी कार्यक्रम | दि.१५.०४.२०२६ ते दि. १६.०४.२०२६ (सकाळी १०:०० ते सायं. ५:०० वाजेपर्यंत) |
| ३ | प्रिबीड मिटींग | दि.३०.०४.२०२६(स. ११.०० वा.) |
| ४ | निविदा दाखल करण्याची अंतीम तारीख | दि. ०७.०५.२०२६ (सायं.५:०० पर्यंत) |
| ५ | निविदा उघडण्याची तारीख व वेळ | |

| अ. क्र. | संस्था | संस्थेचा प्रकार | टेक्निकल बीड ओपनिंग दि.०८.०५.२०२६ | फायनान्शियल बीड श्रओपनिंग दि.१५.०५.२०२६ |
|---|---|---|---|---|
| १) | शारदा यंत्रमाग विणकर सहकारी सूत गिरणी लि., कुंभारी, ता.दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | सहकारी सूत गिरणी | स. ११:०० वा. | स. ११:०० वा. |
| २) | शरद शेतकरी सह. सुत गिरणी लि., नान्नज, ता.दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | सहकारी सूत गिरणी | स. ११:३० वा. | स. ११:३० वा. |
| ३) | टोकडेश्वर सहकारी सूत गिरणी लि., खांडेगांव, तालुका-वसमत, जिल्हा-हिंगोली | सहकारी सूत गिरणी | दु. १२:०० वा. | दु. १२:०० वा. |
| ४) | स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना लि., दहिटणे, ता.अक्कलकोट, जि. सोलापूर | सह. साखर कारखाना | दु. १२:३० वा. | दु. १२:३० वा. |
| ५) | मे.ब्ल्युगोल्ड ट्रेडींग कंपनी प्रा.लि., बि.नं.१२, बानाजी स्ट्रिट,फोर्ट मुंबई | मार्केटींग कंपनी | दु. ०१:०० वा. | दु. ०१:०० वा. |
| ६) | रायगाव शुगर ॲण्ड पॉवर लि., बेलापूर, नवी मुंबई (जप्त मालमत्ता रिव्हेश मेडीकल कॉलेज, हातणे, तलाठी सजा देहर्जे, ता.विक्रमगड, जि.पालघर) | वैद्यकिय संस्था | दु. ०२.३० वा. | दु. ०२.३० वा. |

*** टिप :- ज्या निविदाधारकांनी फॉर्म फीचा भरणा केला असेल त्यांनाच प्रिबीड मिटिंगसाठी हजर राहता येईल.**

**अ) विक्रीने द्यावयाच्या संस्था** **(₹ लाखात)**

| अ क्र | संस्थेचे नांव | क्षमता | मालमत्ता तपशील | राखीव किंमत | बयाना रक्कम विक्रीसाठी (इ.एम.डी.) १० % | दि.३१.०३.२६ अखेरील येणेबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | शारदा यंत्रमाग विणकर सहकारी सूत गिरणी लि., कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर. | १२४८० स्पिंडल्स | जमीन ८.३२ हे. आर. बिल्डींग, प्लॅन्ट ॲण्ड मशिनरी | १४७३.३६ | १४७.३४ | ३२३६.६८ |

| अ क्र | संस्थेचे नांव | क्षमता | मालमत्ता तपशील | राखीव किंमत | बयाना रक्कम विक्रीसाठी (इ.एम.डी.) १० % | दि.३१.०३.२६ अखेरील येणेबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २ | शरद शेतकरी सह. सुत गिरणी लि., नान्नज, ता. दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर | १६१२८ स्पिंडल्स | जमीन १७.३० हे.आर व इमारत, प्लॅन्ट व मशिनरी | २८०९.६८ | २८०.९७ | १६१४.६८ |
| ३ | रीकडेश्वर सहकारी सूत गिरणी लि., खांडेगांव, तालुका–वसमत, जिल्हा–हिंगोली | २११६८ स्पिंडल्स | इमारत व प्लॅन्ट ॲण्ड मशिनरी, जमिन (११.६७ हे.आर.) | ३५००.२४ | ३५०.०२ | ५५७०.२६ |
| ४ | स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना लि., दहिटणे, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर | २५०० टीसीडी | जमीन ७६.७३ हे. आर. बिल्डींग, प्लॅन्ट ॲण्ड मशिनरी | ६०९७.०० | ६०९.७० | १३६०.७४ |
| ५ | मे.ब्ल्युगोल्ड ट्रेडींग कंपनी प्रा.लि., फोर्ट, मुंबई | -- | प्लॉट २६०.९३ चौ.मी. x ५ मजले १३०४.३५ चौ.फु. बांधकाम | ३२६.१६ | ३२.६२ | ८८८.४८ |
| ६ | रायगाव शुगर ॲण्ड पॉवर लि., नवी मुंबई | -- | जमीन २१.०३ हे.आर., हॉस्पिटल, शाळा व इतर इमारती | ५८१२.३८ | ५८१.२४ | ५६९९.३४ |

<u>विक्रीसाठीच्या अटी खालील प्रमाणे –</u>

१. उपरोक्त मालमत्ता ‘जशी आहे आणि जिथे आहे, ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत’ अशा अटींवर संस्थेच्या ज्ञात व अज्ञात देयतेसह विक्री करणेस्तव बँकेतर्फे जाहिरात देण्यात येत आहे. सदर मालमत्तेविषयी सर्व देयतेसंबंधी माहिती घेणेस्तव डयु डिलीजन्स करुन संस्थेच्या सर्व देयतेची खात्री स्वतःच्या स्तरावरुन स्वखर्चाने करणेची जबाबदारी खरेदीदाराची राहिल.

२. विक्री निविदा उपरोक्त तक्त्यात नमुद राखीव किंमतीपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. तसेच भरणा केलेली विक्री निविदा विनाअट असणे आवश्यक आहे. निविदा भरताना निविदाधारकाने हीबाब लक्षात घेणे जरुरीचे आहे.

३. विक्रीच्या निविदेसाठी अनामत (ई.एम.डी.) रकमेचा भरणा बँकेत निविदा सादर करणेपूर्वी आरटीजीएसद्वारे (RTGS/NEFT: IFSC:MSCI0082002, A/c No. 0002116900000010, A/c. Name- DIRR, Head office) दि महाराष्ट्र स्टेट को. ऑप. बँक लि., मुंबई येथे जमा करणे आवश्यक आहे.

४. विक्रीची निविदा पुस्तिका (बीड टेंडर डॉक्युमेंट) बँकेचे मुख्य कचेरी, मुंबई येथील डीआयआरआर विभागाच्या व्यवस्थापिका, तसेच प्रादेशिक कार्यालय, पुणे, नाशिक व नांदेड येथील व्यवस्थापकांकडे दि.०८.०४.२०२६ ते दि.०७.०५.२०२६ या दरम्यान कार्यालयीन दिवशी (सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त) सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत मिळतील. तसेच निविदा पुस्तिका (बीड टेंडर डॉक्युमेंट) बँकेच्या बेबसाईटवरुनही (https://msc.bank.in) डाऊनलोड करुन भरता येतील. मात्र डाऊनलोड केलेल्या निविदा /टेंडर बँकेत सादर/दाखल करणेपूर्वी विक्री टेंडर डॉक्युमेंटपोटी फॉर्म फी ₹२९,५००/– (जी.एस.टी.सह) एन.ई.एफ.टी.द्वारे भरणे आवश्यक राहील.

५. टेंडर उघडण्याच्या दिवशी ५ पेक्षा जास्त निविदा प्राप्त झाल्यास, नमूद विक्री रक्कमेच्या राखीव किंमतीपेक्षा जास्त रकमेच्या निविदा असणाऱ्या प्रथम ३ क्रमांकाच्या निविदा धारकांना एकत्रित बसवून सर्वांसमक्ष जास्तीत जास्त बोली लावण्याची संधी दिली जाईल. त्यापैकी जास्तीत जास्त बोली लावणाऱ्या निविदाधारकाची निविदा, त्यांनी लावलेल्या बोलीची रक्कम फेरनिविदा म्हणून घेण्यात येईल. तसेच ५ पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास सर्व पात्र निविदाधारकांना एकत्रित बसवून सर्वांसमक्ष जास्तीत जास्त बोली लावण्याची संधी दिली जाईल. सदरची बोली निविदाधारकाने किमान ₹१०.०० लाख व त्यापटीत वाढवावयाची आहे. तथापि एकदा दिलेला देकार कोणत्याही परिस्थितीत कमी करता येणार नाही.

६. निविदा सादर/दाखल करावयाची अंतिम तारीख दि.०७.०५.२०२६ (सायंकाळी ५:०० पर्यंत) राहील. निविदा मुख्य कचेरी, तिसरा मजला, सर विठ्ठलदास ठाकरसी स्मृतीभवन ९, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन, फोर्ट, मुंबई ४००००१ येथे ठेवलेल्या निविदा ड्रॉप बॉक्समध्ये दाखल कराव्यात.

७. इच्छूक निविदाधारक दि.१५.०४.२०२६ ते दि.१६.०४.२०२६ या दिवशी कार्यालयीन वेळेत सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० पर्यंत संस्था स्थळी भेट देवून मालमत्तेची पाहणी करु शकतात.

८. सर्व इच्छुक खरेदीदार निविदाधारकांनी संस्थेचे **ड्यु डिलिजन्स** स्वतः, स्वखर्चाने करुन घ्यावयाचे आहे.

९. निविदाधारकाने संस्था विक्रीने घेण्यासाठी टेंडर भरले म्हणजे निविदाधारकास संस्थेची पूर्वीची, चालू भविष्यातील सर्व देणी , कर्ज इत्यादी बाबतची पूर्ण माहिती आहे असे गृहित धरले जाईल.

१०. निविदाधारकाने सही शिक्क्यानिशी निविदा सादर केली म्हणजे निविदाधारकाने निविदेमधील सर्व अटी/शर्ती वाचल्या असून त्या त्यांना मान्य आहे असे गृहित धरले जाईल. तद्नंतर निविदाधारकाने कोणत्याही अटी/शर्ती शिथिल करणेबाबत मागणी केल्यास त्यांनी सादर केलेली निविदा रद्द केली जाईल व त्यांनी भरणा केलेली ईएमडीची रक्कम जप्त करण्यात येईल.

११. टेक्निकल बीड निविदाधारक किंवा त्यांच्या प्रतिनिधीसमोर उपरोक्त नमुद तपशिलाप्रमाणे नमुद संस्थेच्या दिलेल्या तारीख व वेळ (दि.०८.०५.२०२६) नुसार उघडण्यात येतील.

१२. निविदेतील अटी/शर्ती प्रमाणे निविदाधारकाने संपूर्ण कागदपत्रे टेक्निकल बीड सोबत सादर करणे आवश्यक आहे. निविदेतील अटीनुसार निविदाधारकाच्या निकषास पात्र होणाऱ्या निविदाधारकांचे फायनान्शीअल बीड उघडण्यास पात्र ठरतील.

१३. टेक्निकल बीड अपात्र झालेल्या निविदाधारकास त्यांची निविदा अपात्र झाल्याबाबत कळविण्यात येईल व त्यांनी भरणा केलेली ईएमडीपीटीची रक्कम (बिनाव्याजी) परत करण्यात येईल.

१४. पात्र निविदाधारकांच्या उच्चतम निविदा बँकेच्या मा.प्रशासक कार्यकारी सभेसमोर अंतीम करण्यासाठी ठेवण्यात येतील व त्याप्रमाणे यशस्वी निविदा धारकास कळविण्यात येईल.

१५. विक्रीच्या यशस्वी निविदाधारकास मालमत्ता स्वतःच्या नावावर करुन घेण्यासाठी, सेल सर्टिफिकेट नोंदणीकृत करणेसाठी लागणारा खर्च उदा. मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क इत्यादी सर्व खर्च स्वतःला करावा लागेल.

१६. मालमत्ता विक्री देणेचे अधिकार सरफेसी कायदा-२००२ अंतर्गत प्राधिकृत अधिकारी यांना प्राप्त आहेत. त्यानुसार कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचा/रद्दबातल ठरविण्याचे, पुढे ढकलण्याची, संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार बँकेच्या प्राधिकृत अधिकारी यांना राहतील.

**वैधानिक नोटीस**

कर्जदार आणि जामिनदार यांना सूचित करण्यात येते की, राज्य सहकारी बँकेच्या एकूण कर्ज येणेबाकीचा भरणा निविदा प्रक्रियेपुर्वी करावा. अन्यथा जप्त मालमत्ता विक्री करून कर्ज वसुली केली जाईल. तसेच विक्रीप्राप्त रकमेतून संपूर्ण कर्ज वसुली न झाल्यास उर्वरित कर्जबाकी व्याज व इतर खर्चासह आपणांकडून वसुली केली जाईल याची नोंद घ्यावी.

सही/-

**( दिलीप एन. दिघे)**

**व्यवस्थापकीय संचालक तथा प्राधिकृत अधिकारी**

**दि महाराष्ट्र स्टेट को.ऑप.बँक लि., मुंबई**

**दिनांक :** ०८.०४.२०२६

**ठिकाण :** मुंबई